# **प्रसिध्दी पत्रक**

**श्री. गंगाधर नामदेव डहाळे, वय ३८ वर्ष, धंदा नौकरी, कनिष्ठ लिपीक, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर, रा. घर नंबर २८७, १३ वी, योजना, एन-२, सिडको, औरंगाबाद हे ५००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. गंगाधर नामदेव डहाळे, वय ३८ वर्ष, धंदा नौकरी, कनिष्ठ लिपीक, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर, रा. घर नंबर २८७, १३ वी, योजना, एन-२, सिडको, औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १०/०९/२०१८ रोजी पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद येथील आस्थापणा शाखा येथे |
| लाचेची रक्कम | :- | ५००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी प्लॅट/ रोहाऊस घेण्यासाठी परवानगीच्या केलेल्या अर्ज प्रकरणात सदरचा अर्ज पुटअप करून परवानगी मिळवून देण्यासाठी. |

यातील तक्रारदार हे पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर येथे पोलीस कर्मचारी असून, त्यांनी स्वतःचे घर नसल्याने नवीन घर (प्लॅट/ रोहाऊस) खरेदी करण्यासाठी मा. पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांना सदर घर खरेदी साठी परवानगी मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता.त्याकरिता तक्रारदार आस्थापणा शाखेतील लिपीक श्री. डहाळे यांना दि.०७/०९/२०१८ रोजी भेटले असता, श्री. डहाळे यांनी तक्रारदार यांच्याकडे घर (प्लॅट/ रोहाऊस ) घेण्यासाठीच्या परवानगीचा अर्ज पुटअप करून परवानगी मिळवून देण्यासाठी ५००/- रु लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांची श्री. गंगाधर नामदेव डहाळे, कनिष्ठ लिपीक, यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १०/०९/२०१८ रोजी श्री. गंगाधर नामदेव डहाळे, वय ३८ वर्ष, धंदा नौकरी, कनिष्ठ लिपीक, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणी बाबत पडताळणी केली असता, श्री. गंगाधर डहाळे यांनी तक्रारदार यांच्याकडे ५००/- रुपयाची लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.१०/०९/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला असता, श्री. गंगाधर नामदेव डहाळे, वय ३८ वर्ष, धंदा नौकरी, कनिष्ठ लिपीक, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर यांनी पंच साक्षीदारा समक्ष ५००/- रुपये लाचेची रक्कम पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर यांचे कार्यालयातील आस्थापणा शाखेत तक्रारदाराकडून स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४

Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधिक्षक कार्यालय अँटी करप्शन ब्युरो औरंगाबाद

बाळा कुंभार
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.